**प्रेसनोट** **दिनांकः- १३/०३/२०१९**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर**

**<u>विश्रामबाग पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील तडीपार गुन्हेगार जेरबंद.</u>**

दिनांक-११/०३/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे अंकीत संभाजी पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी श्री. नितिन म्हस्के, पोलीस उप निरीक्षक हे सहा.पो.फौज. बापु करवंदे व पोलीस शिपाई मोहन रघतवान यांचेसह अवैध धंद्यावरील कारवाई करण्याचे अनुषंगाने हद्दीत पेट्रोलींग फिरत असतांना रात्रौ २०-५० वाजताचे सुमारांस त्यांना विश्रामबाग पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील गुंड व सध्या पुणेशहर व जिल्हयातुन तडीपार असलेला इसम नामे गौतम प्रकाश परदेशी, वय-३५ वर्षे, राहणार-१३/१४, जोशीवाडा,सदाशिव पेठ,पुणे, हा विशाल वाईन्स्, अलका टॉकीज चौक,पुणे याठिकाणी उभा असलेला दिसला. सदर वेळी वरनमुद पोलीस पथकाने त्यांस पकडुन व पोलीस ठाण्यात आणुन खातरजमा केली असता वरनमुद आरोपी नामे गौतम प्रकाश परदेशी, वय-३५ वर्षे, राहणार-१३/१४, जोशीवाडा,सदाशिव पेठ,पुणे, यांस मा.पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ-१,पुणेशहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक-०९/२०१८, दिनांक-२७/०३/२०१८ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (ब) प्रमाणे पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे हद्दीतुन पुर्वपरवानगी शिवाय परत न येण्याचे अटीवर ०१ वर्षे मुदतीकरीता तडीपार केलेले असतांना व त्यांस नमुद तडीपार आदेशाची बजावणी करुन राजारामपुरी पोलीस स्टेशन, जिल्हा-कोल्हापुर येथे नेवुन सोडलेले असतांना तो सदर आदेशाचा भंग करुन पुण्यामध्ये वरनमुद ठिकाणी वावरतांना मिळुन आल्याने त्यांस अटक करुन त्याचेविरुध्द् विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गुन्हा नोंद क्रमांक-१०९/२०१९, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यांत आलेली आहे.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.